वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरूवार दि. २३ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता

## प्रधानमंत्री आवास योजनेचा नागरिकांनी लाभ घ्यावा-हाफिज अशफाक



बीड, (दिव्य न्युज):-गरिबांचे घराचे स्वप्न साकार व्हावे यासाठी शासनाकडून राबविण्यात येत असलेली प्रधानमंत्री आवास योजना शहरी २.० टप्पा सुरू झाली आहे यासाठी ऑनलाइन फॉर्म भरून मागविण्यात येत आहेत. तरी बीड नगरपरिषद हद्दीतील शहरातील नागरिकांनी संपूर्ण कागदपत्रांच्या मूळ प्रतींसह ऑनलाइन नोंदणी करून प्रधानमंत्री आवास योजना शहरी २.० चा जास्तीत जास्त प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन मा. नगर सेवक हाफेज अशफाक यांनी केले आहे.

# आधी खुर्ची बदलली, नंतर बंद दाराआड चर्चा

## अजित पवार आणि शरद पवार यांच्या भेटीने चर्चांना उधाण

### राष्ट्रवादीचे दोन्ही गट अन् ठाकरे कुटूंब एकत्र येणार?राज्याच्या राजकारणात रंगली चर्चा

**पुणे, (दिव्य न्युज):- शरद पवार आणि अजित दादा हा पवार कुटुंबियांसाठीच नाही तर राष्ट्रवादी काँग्रेससाठी पण हळवा कोपरा आहे. काका-पुतण्यात दिलजमाई होण्याच्या चर्चांना अचानक अधूनमधून उकळी येते. पुण्यात एका कार्यक्रमानिमित्त हे दोन्ही नेते एकाच मंचावर दिसून आले. पण यावेळी दादांनी, काकांच्या शेजारी बसणं टाळलं. नावाची पाटीची जागाच बदलली. अजितदादा आणि शरद पवार यांच्यामध्ये सहकारमंत्री बाबासाहेब पाटील बसले होते.**



१२ डिसेंबर २०२४ रोजी शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त दिल्लीत अजित पवार यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन शुभेच्छा दिल्या होत्या. दोन्ही नेते एकत्र येण्याच्या वावड्या अनेकदा उठल्या. आज पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. त्याचे अध्यक्ष शरद पवार होते. वार्षिक सर्वसाधारण सभा झाल्यानंतर अजित पवार हे मंचावर आले. तेव्हा त्यांनी आसन व्यवस्थेत बदलाची सूचना केली. त्यांच्या नावाची पाटी दोन खुर्च्या सोडून लागली.माध्यमांशी बोलताना अजितदादांनी या घडामोडीविषयी प्रतिक्रिया दिली. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांना शरद पवार यांच्याशी बोलायचे होते. मी शरद पवार यांच्याशी केव्हाही बोलू शकतो. त्यामुळे बाबासाहेबांना त्याठिकाणी बसवलं. माझा आवाज इतका आहे की, दोन खुर्च्या सोडून तिसऱ्याला सुद्धा माझा आवाज जाईल, असे अजित पवार म्हणाले.

### मग बंद दाराआड गुप्तगू

दोन्ही नेते हे जवळ बसले नसले तरी एकाच मंचावर होते. कार्यक्रमानंतर अजितदादा आणि शरद पवार यांच्यात बंद दाराआड चर्चा झाली. त्याविषयी माध्यमांनी त्यांना विचारलं. या व्यवसायाच्या (शुगर) करता जे महत्वाचे प्रश्न आहेत. त्याविषयी पवारांशी बोलणे झाल्याचे ते म्हणाले. सहकार खातं, एक्साईज खातं, कृषी खातं आणि ऊर्जा खातं या चौघांचा या उद्योगाशी थेट संबंध येतो. त्याविषयावर चर्चा झाल्याचे अजितदादांनी सांगितलं.

### कृषी खात्यातील भ्रष्टाचाराला लगाम घालणार

सध्या विविध गैरप्रकार, गैरव्यवहार आणि घोटाळ्यांमुळे कृषी विभाग गाजत आहे. याविषयी अजित पवार यांनी त्यांचे मत व्यक्त केले. कृषीचा आढावा मी घेतला, काही प्रवृत्ती विकृत असते जी गैरफायदा घ्यायला बघत आहे. या क्षेत्रात पारदर्शकता कशी आणता येईल याबद्दल आम्ही लक्ष घालत आहे. मुख्यमंत्री आल्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल, असे ते म्हणाले.

# पत्नीचा खून करुन खुनाचा व्हिडीओ केला व्हायरल

## बीडच्या तरुणाचे पुण्यात कृत्य

पुणे, (दिव्य न्युज):- घरगुती वादातून कोर्टात स्टेनो म्हणून काम करणाऱ्या पतीने कात्रीने गळ्यावर वार करून पत्नीचा खून केल्याची घटना समोर आली आहे. खून केल्यानंतर या पतीने या खुनाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केला आहे. ज्योती शिवदास गिते असे मृत महिलेचे नाव आहे. पुण्यातील खराडी परिसरातील ही धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी शिवदास तुकाराम गिते (३७) याला अटक केली आहे. शिवदास गिते हा मूळ बीडचा रहिवासी आहे. तो न्यायालयात स्टेनो म्हणून नोकरी करतो.

सध्या शिवदास गीते पुण्यातील चंदननगर परिसरात तुळजाभवानीनगर येथे तो भाड्याने घर घेऊन राहत आहे. गिते पती-पत्नीमध्ये घरगुती कारणावरून भांडणे होत होती. बुधवारी पहाटे साडेचार वाजतादेखील याच कारणावरून त्यांच्यात जोरदार भांडण झाले. या वेळी रागाच्या भरात आरोपी शिवदास याने घरातील धारदार कात्रीने ज्योती हिच्या गळ्यावर वार केला. पतीने केलेल्या हल्लानंतर पत्नी जिवांच्या आकांताने ओरडली. त्यांचा आवाज ऐकून शेजारील लोक धावत घरी आले. पण तोपर्यंत ज्योती गिते या रक्ताच्या थारोळ्यात पडल्या होत्या. या घटनेची माहिती मिळताच

पान २ वर

### स्वरक्षणासाठी हत्या केली - आरोपी


शिवदास गिते म्हणाला की, ज्योतीला मारण्याचा माझा हेतू नव्हता. मी तिला सांभाळले असते. माझ्यावर ज्योतीने ही वेळ आणली आहे. मी यापूर्वी कोणताच गुन्हा केलला नाही. तर गावातील एका कुटुंबानेही आपल्याला मारण्यासाठी प्रयत्न केला असा आरोपही गितेने व्हिडीओमध्ये केला आहे. माझ्या लेकराला मारण्याचाही हिने विचार केला असेल, म्हणून मला हे करावे लागले. मला हिला मारण्याची इच्छा नव्हती. मला मारण्याचा प्रयत्न हिच्याकडून होत होता. मी स्वरक्षणासाठी आणि माझ्या मुलाच्या भविष्यासाठी खून करावा लागला. माझ्या हत्येचे नियोजन करण्यासाठी ही बाहेर जात असल्याचे त्यांने व्हिडीओत म्हटले आहे.

# अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत दारू भट्टयावर धाड

## ३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त ९ आरोपीवर गुन्हा दाखल

फोटो अंबा

अंबाजोगाई, (दिव्य न्युज):- अप्पर पोलीस अधीक्षक तिडके यांच्या पथकाने अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील वान नदीपात्रातील डोंगरदऱ्यात सुरू असलेल्या दारू भट्टयावर धाड टाकून ३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून ९ आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



या विषयी सविस्तर वृत्त असे की बीड जिल्हा पोलिस अधीक्षक पदी नवनीत कॉवत यांनी पदभार स्वीकारल्या पासून जिल्ह्यातील अवैध धंदे बंद होत असतानाच अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दी मध्ये आजही

▶▶ पान २ वर

# शिर्डीतील धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या विधानांचा निषेध-सलीम सारंग

शिर्डी, (दिव्य न्युज):- शिर्डी हे साईबाबांच्या पवित्र स्थळामुळे जगप्रसिद्ध आहे. सबका मालिक एक हा साईबाबांचा संदेश सर्वधर्म समभाव आणि बंधुभावाचा आहे. मात्र, अलीकडील पत्रकार परिषदेत आमदार महोदयांनी केलेली विधाने अत्यंत खेदजनक आणि समाजात द्वेष निर्माण करणारी असल्याचं सलीम सारंग यांनी म्हटल आहे.





आमदार महोदयांनी शिर्डीतील दर्ग्याच्या निधीबाबत प्रश्न उपस्थित करून हिंदू-मुस्लिम समाजामध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. शिर्डीच्या नागरिकांनी नेहमीच एकत्रितपणे बंधुभाव जोपासला आहे, आणि अशा प्रकारच्या विधानांमुळे या परंपरेला तडा जाऊ शकतो.

मुस्लिम समाजाने निवडणुकीत मतदान केले नाही, असे

▶▶ पान २ वर

# नमः शिवाय! सनीला सोडा त्याला कशात गुंतवू नका

## वाल्मिक कराड आणि बीड पोलिसांची ऑडिओ क्लिप व्हायरल



### पोलिस अधिकारी काय म्हणाले?

सनी हा सराईत गुन्हेगार आहे. आणि त्याच्या संबंधी वाल्मीक कराड आणि पोलीस निरीक्षक शितकुमार बल्लाळ यांच्यात थेट संवाद झाला असल्याने पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान सदर क्लिप

▶▶ पान २ वर

### सनी आठवलेनी,कॉल रेकॉर्डिंग सोबत पोस्ट केलेली जशास तशी...

बीडमध्ये नेमकं चाललय काय? का मला गुंतविले जातंय? खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत?

▶▶ पान २ वर

# वाल्मिक कराडचा खंडणी प्रकरणातील जामीन अर्ज मागे; कारण गुलदस्त्यात

बीड, (दिव्य न्युज):- वाल्मिक कराड याचा खंडणी प्रकरणातील जामीन अर्ज मागे घेण्यात आला आहे. वाल्मिकच्या वकिलांनी हा अर्ज मागे घेतला आहे. जामीन अर्जाच्या सुनावणीसाठी दोन तारखा झाल्यानंतर आज सुनावणी होणार होती. त्यामुळे कराडला जामीन की एमसीआर होणार याकडे सर्वांचे लक्ष लागलेले होते. मात्र वाल्मिकचे वकील अशोक कवडे यांनी जामीन अर्ज मागे घेतला आहे. जामीन अर्ज मागे घेण्याचं कारण गुलदस्त्यात आहे. मात्र, कराड याने अर्ज मागे घेतल्याने आश्चर्य व्यक्त केलं जात आहे.



वाल्मिक कराडने जामीन अर्ज मागे घेतल्याची माहिती समोर आलेली असतानाच कराड याची प्रकृतीही बिघडल्याचं समोर आलं आहे. वाल्मिक कराडला पोटदुखीचा त्रास होत आहे. त्यामुळे त्याला रुग्णालयात भरती करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

पोटदुखीचा त्रास, रुग्णालयात दाखल

याबाबत बीड जिल्हा रुग्णालयाचे प्रभारी शल्यचिकित्सक डॉक्टर एस.बी. राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. वाल्मिक कराडला पोटात दुखण्याचा त्रास होत असल्याचे जिल्हा कारागृहाकडून कळवण्यात आले होते. त्यानुसार कारागृहात जाऊन तपासणी करण्यात आली. पुढील तपासणी करण्यासाठी जिल्हा

▶▶ पान २ वर

# भय इथलं संपत नाही! बीडमध्ये महिला सरपंचाकडेच मागितली खंडणी, जीवे मारण्याची दिली धमकी

बीड, (दिव्य न्युज):- बीडमध्ये मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास सुरू आहे. पण दुसरीकडे बीडमध्ये एका महिला सरपंचाला चक्क खंडणीची मागणी करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. ज्या व्यक्तीने धमकी दिली त्याच्यावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी सरपंच महिलेनं केली आहे.

मस्साजोग येथील सरपंच हत्या प्रकरण ताजे असतानाच आणखी एक धक्कादायक प्रकार बीडच्या अंबाजोगाई तालुक्यातील ममदापूर (पाटोदा) येथे उघडकीस आला आहे. मंगल राम मामडगे असं या महिला सरपंचाचं नाव आहे.

आम्हाला गावामध्ये कोणतचं काम करू देत नाही. माजी सरपंच वसंत सोपान शिंदे, अनिल लालासाहेब देशमुख आणि ज्ञानोबा श्रीमंत देशमुख हे सारखे खंडणी

▶▶ पान २ वर



# पोलिस असल्याचे सांगून महिलेचे सव्वा लाखाचे गठण घेऊन पोबारा

केज, (दिव्य न्युज):- धुणीभांडी करण्यास निघालेल्या एका महिलेस तोतया पोलिसाने अंगावरील दागिने काढून पर्समध्ये ठेवायला लावले. त्यानंतर महिलेचे १ लाख २० हजार रुपयांचे मिनीगंठण घेऊन दोघांनी दुचाकीवरून पोबारा केल्याची घटना केज - कळंब रस्त्यावरील विठाई पूरम समोर बुधवारी सकाळी १० ते १०.३० वाजेच्या दरम्यान घडली.केज तालुक्यातील कानडीमाळी

▶▶ पान २ वर

# तांड्यावरील घरांना अचानक आग, गूढ वाढल्याने अंनिसकडून शोधमोहीम; ग्रामस्थांमध्ये भीती

चिंचाळा, (दिव्य न्युज):- वडवणी तालुक्यातील आगर तांड्यावरील घरातील संसारोपयोगी वस्तूंना आठ दिवसांपासून अचानकपणे आग लागत असल्याने येथील नागरिक भयभीत आहेत. दरम्यान वडवणीचे तहसीलदार आणि पोलिसांनी

▶▶ पान २ वर



# बीडच्या एमआयडीसीत ५५ कोटींच्या पायाभूत सुविधा

**दिव्य वार्ता**

**बीड :** जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राचा विकास करण्यासाठी येथील उद्योगनगरीला पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून ५४ कोटी ९२ लाख ९३ हजार रुपयांच्या विविध कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. ग्रामीण भागातील उद्योगाला चालना देण्यासाठी औद्योगिक विकास महामंडळाकडून तालुका स्तरावर औद्योगिक नगरी उभारण्यासाठी पायभूत सुविधांची कामे सुरू करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यात बीड शहर, माजलगाव, गेवराई, आष्टी, पाटोदा आणि धारुन या पाच तालुक्यांमध्ये पायाभूत सुविधा दिलेल्या आहेत. गेवराई येथे एमआयडीसी मंजूर करण्यात आली आहे. मात्र, त्या ठिकाणी आणखी सरकारी जागेचे ५० हेक्टरपर्यंत भूसंपादन करणे बाकी राहिले आहे.



### 'या' मिळणार सुविधा

जिल्ह्यातील सहा ठिकाणी ५४ कोटी ९२ लाख ९३ हजार रुपये खर्च करून कामे होणार आहेत.

**रस्ते, ड्रेनेज, स्ट्रीट लाइट, पाइपलाइन, गार्डन, विद्युतपुरवठा, रस्ता दुभाजक, फुटपाथ यासह विविध कामे यातून होणार आहेत, असे एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी कळविले आहे.**

**५०**
हेक्टरपर्यंत भूसंपादन करणे बाकी राहिले आहे

### बीडला उद्योगभवन, धारूर, अंबाजोगाईला बसस्थानक

बीड शहरात उद्योग भवन उभारण्यात येणार आहे. तसेच धारूर आणि अंबाजोगाई येथील एमआयडीसी परिसरात बसस्थानक उभारण्यात येणार आहे. या बसस्थानकांच्या निर्मितीसाठी स्वतंत्र निधी या ५५ कोटींमध्ये उपलब्ध करून देण्यात आला आहे.


### उद्योगाची गरज

बीड जिल्हा हा पहिल्यापासून कष्टकऱ्यांचा जिल्हा आहे. या जिल्ह्यात एका मोठा उद्योग आला तर त्यावर आधारित आणखी लहान उद्योगही सुरू होतील.

**या जिल्ह्यात कामगारांची संख्या भरपूर आहे. मात्र, या कामगारांच्या हाताला काम नाही. जिल्ह्यात प्रक्रिया उद्योग मोठ्या प्रमाणावर आहेत. मात्र, ॲटोमोबाइल क्षेत्रावर आधारित उद्योग जिल्ह्यात येण्याची आवश्यकता आहे.**

### एमआयडीसीसाठी आणखी भूसंपादन

सर्व आकडे हेक्टरमध्ये




# तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

केज , (दिव्य न्युज):- एका २१ वर्षीय ऊसतोड मजुराने चिंचेच्या झाडास गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना डोका (ता. केज) येथे बुधवारी (दि. २२) सकाळी उघडकीस आली. त्याने आत्महत्या का केली ? याचे कारण स्पष्ट झाले नव्हते.



डोका (ता. केज) येथील ऊसतोड मजूर रमाकांत शेषेराव भांगे (वय २१) या तरुणाने गावातील चिंचेच्या झाडास गळफास लावून आत्महत्या केल्याचे बुधवारी सकाळी उघडकीस आले. ही माहिती मिळताच केज ठाण्याचे जमादार बालासाहेब बांगर, पोलीस नाईक शिवाजी कागदे यांनी घटनास्थळी भेट देत मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवून दिला. चिंचोलीमाळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले. रमाकांत भांगे याने आत्महत्या का केली ? याचे कारण स्पष्ट झाले नव्हते.

पान ४ वरून

## लाडकी बहीण योजनेबद्दल

यांनी या याजनेतील लाभार्थी महिलांना दिलेले पैसे परत घेणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. अजित पवारांनी नुकतंच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी याबद्दल स्पष्टीकरण दिले.

महिलांकडून रिकव्हरी करण्याचा अजिबात विचार नाही

लाडकी बहीण योजना लागू केली तेव्हा आमच्याकडे मर्यादित वेळ होता. त्यामुळे आम्हाला बहिणींचे आधार कार्ड लिंक करता आले नाहीत. पण आता आम्ही खरोखर ज्या लाडक्या बहिणी आहेत, ज्यांना याचा लाभ मिळणे आवश्यक आहे, त्या दृष्टीने आम्ही पावलं उचलत आहोत, असे अजित पवार म्हणाले. पण या योजनेतील महिलांकडून रिकव्हरी करण्याचा अजिबात विचार नाही, असेही अजित पवारांनी म्हटले. त्यामुळे आता लाडक्या बहिणींना देण्यात आलेले पैसे परत घेतले जाणार नाही हे स्पष्ट झाले आहे.

## परभणी येथील वंसतरावजी

मान्यवर मंडळी उपस्थित होती राज्यमंत्री सौ मेघना साकोरे बोर्डीकर , कृषी राज्यमंत्री अशीष जयस्वाल, खा. फौजीया खान, खा. संजय जाधव, आ. राहुल पाटील, आ .राजेश जी विटेकर माजी मंत्री गणेशरावजी दूधगावकर, आ. रत्नाकरजी गुट्टे, प्राध्यापक व विदयार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते असे आमचे प्रतिनिधी यांनी कळविले आहे.

## आगीच्या अफवेमुळे घात

कठीण जात असल्याचे सूत्रांनी सांगितले. जखमींकडून विचारपूस करून मृतदेहांची ओळख पटविली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त करताना मृतांना श्रद्धांजली अर्पण केली.

मंत्री महाजन, खासदार वाघ घटनास्थळी

अपघात घडल्यानंतर तासाभरातच राज्याचे जलसंपदा तथा आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन घटनास्थळी दाखल झाले. ज्या ठिकाणी हा अपघात घडला त्या ठिकाणी जाऊन त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. घटनास्थळी पोहोचलेल्या वैद्यकीय पथकातील कर्मचाऱ्यांना त्यांनी सूचना केल्या आहेत. जळगावच्या खासदार श्रीमती स्मिता वाघ यांनीही तातडीने घटनास्थळी रवाना होत जखमींची विचारपूस केली. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्यासह रेल्वेचे अधिकारीही घटनास्थळी दाखल झाले. पालकमंत्री गुलाबराव पाटलांकडून परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. घटनास्थळी नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असून, मृत व जखमी प्रवाशांची माहिती मिळविण्यासाठी हा कक्ष कार्यरत आहे. मृतांच्या नातेवाइकांना मदत देण्याबाबत योग्य ती चर्चा देखील सुरू असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.

## तहसीलमध्ये पिण्याच्या

आलेल्या एका ६८ वर्षीय वयोवृद्धाला पाण्यासाठी भटकंती करावी लागली. जवळ पैशाची चणचण असताना नाईलाजाने त्यांना विकतचे पाणी प्यावे लागले. उन्हाळ्याचे दिवस बघता पाण्याअभावी नागरिकांची होत असलेली गैरसोय प्रशासन दूर करेल का, अशी विचारणा सर्वसामान्यांतून होत आहे.

## अटकेतील मनीषने दिली

असल्याचे समोर आले होते. पोलिसांनी तपासात पुण्यातून प्रवीण गायकवाड यालाही अटक केली होती. त्याच्याकडून साडेआठ हजारांच्या बनावट नोटा व एक पिस्तूल जप्त केले होते. दरम्यान, या बनावट नोटांचा सूत्रधार मनीष क्षीरसागर हा फरार होता. शहर पोलिसांना तो सापडत नव्हता. अशातच महिनाभरापूर्वी पेठ बीड भागात आठवले गँगकडून झालेल्या गोळीबार प्रकरणात मनीष क्षीरसागरचे नाव समोर आले होते. या गुन्ह्यात स्थानिक गुन्हे शाखेने अक्षय आठवलेसह मनीष क्षीरसागर याला पुण्यातून अटक केली होती. दोघेही सध्या कारागृहात होते. दरम्यान, बनावट नोटांच्या प्रकरणात फरार असलेल्या मनीष क्षीरसागर याला न्यायालयाच्या परवानगीने शहर पोलिसांनी कारागृहातून ताब्यात घेऊन अटक केली होती. त्याला ५ दिवसांचा पीसीआर मिळाला होता. तपासात त्याचा मोबाइल जप्त करण्यात आला आहे. त्याने दिलेल्या माहितीनुसार आठवले गँगचा सहभाग यात स्पष्ट झाला आहे.

पान १ वरून

## पत्नीचा खून करून

चंदननगर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी तातडीने ज्योती यांना ससून रुग्णालयात दाखल केले. मात्र तोपर्यंत फार उशीर झाला होता. रुग्णालयात जाता डॉक्टरांनी ज्योती यांना मृत घोषित केले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार 'माझी प्रॉपर्टी माझी पत्नी हडप करेल.', असा त्याला संशय होता. या संशयात त्याने ज्योतीची हत्या केली. पुढील तपास खराडी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय चव्हाण करत आहेत. ज्योती गीतेचा मृतदेह तिच्या नातेवाईकांकडे देण्यात आला असून तो तिच्या मूळ गावी पाठवण्यात आला आहे.

## अंबाजोगाई ग्रामीण

स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांच्या कृपेने अवैध धंदे सुरूच असून याच पोलीस स्टेशन हद्दी मध्ये वान नदी पात्रात आज ही गावठी दारू भट्टया सुरूच आसून दिनांक २२.१.२०२५ रोजी दुपारी दीड वाजता अप्पर पोलीस अधीक्षक यांना माहिती मिळाल्या वरून त्या स्वतः, वाचक सपोनी ठाकूर तसेच कार्यालयातील स्टाफ यांना व दोन पंच बरोबर घेऊन वाना नदी पात्रात त्याचबरोबर नागनाथ मंदिराच्या परिसरात वेगवेगळ्या टीम करून अडीच वाजता छापा मारला असता त्या ठिकाणी काही इसम हे हातभट्टी दारू च्या भट्टया लावून दारू तयार करीत असल्यास निदर्शनास आले. त्या ठिकाणी अचानक छापा मारला असता दोन आरोपी जाग्यावर मिळून आले व दारूची वाहतूक करण्यासाठी एक घोडा व एक मोटरसायकल तसेच काही आरोपी डोंगरदऱ्याचा आश्रय घेऊन पळून गेले. मिळून आलेल्या दोन आरोपींची नावे पुढील प्रमाणे १) बाबा कासम पप्पू वाले २) मुस्तफा बाबा पप्पू वाले असे दोन आरोपी मिळून आले त्यांच्याकडे पळून गेलेले आरोपींची नाव गाव विचारले असता ते पुढील प्रमाणे १) राजू गंगा चौधरी नंबर २) अरे चंदू साखर वाले ३) अब्दुल जुम्मा चौधरी ४) इबुकसिम नुरीवाले ५) लल्लू कासम पप्पू वाले ६) नदीम लुल्स वाले ७) मगबुल राणू परसुवाले तर सर्व राहणार गवळीपुरा अंबाजोगाई. वरील एकूण ९ आरोपीकडून तयार दारू व फसफसते रसायन तसेच एक घोडा व एक मोटरसायकल असे मिळून तीन लाखाचा मुद्देमाल जप्त केला सदरची कारवाई ही अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके मॅडम, सोबत सपोनी ठाकूर पोह देवकते सातपुते सुरवसे, पठाण, तागड यांनी केली.

## शिर्डीतील धार्मिक

असल्याचे स्पष्ट केले आहे. असे असतानाही, धार्मिक तेढ निर्माण करणारी कृती निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना शोभणारी नाही.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विचारधारेने नेहमीच छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीचा आधार घेत सर्व समाजाला सोबत घेऊन काम करण्यावर भर दिला आहे. मात्र, आमदार महोदयांनी या विचारसरणीला सोडून केवळ वैयक्तिक फायद्यासाठी कृती करणे, हे त्यांच्या पक्षीय भूमिकेशी विसंगत आहे.

आमदारांनी मंत्रिमंडळात स्थान मिळवण्यासाठी अशा प्रकारच्या विधानांद्वारे लोकांच्या भावनांशी खेळू नये. समाजात धार्मिक तेढ निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी संग्राम जगताप यांच्यावर राहील असंही ते म्हणाले. मुस्लिम वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने आम्ही असे आवाहन करतो की, आमदार महोदयांनी विकासाच्या राजकारणावर भर द्यावा, समाजातील सर्व स्तरांशी समन्वय साधून लोकांच्या समस्यांचे निराकरण करावे आणि साईबाबांच्या सबका मालिक एक या संदेशानुसार सर्वांना एकत्र ठेवण्याचा प्रयत्न करावा.

## वाल्मिक कराडचा

रुग्णालयात दाखल करणे गरजेचे असल्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. त्यानुसार कारागृह प्रशासनाने जिल्हा रुग्णालयात दाखल केले होते. कराडवर सध्या उपचार सुरू आहेत. काही तपासणी करणे गरजेचे आहे. सोनोग्राफी, रक्त चाचणी, यूरिन टेस्ट केली जाणार आहे.. त्याचा अहवाल आल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल, असं एसबी राऊत म्हणाले. पोटदुखीचा त्रास होत असताना वाल्मिक कराडला काल रात्री १२.३० वाजता जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सध्या याच ठिकाणी त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

आलिशान वाहनातून फरार?

दरम्यान, कराड आणि इतर आरोपी सीआयडीला शरण जाण्यापूर्वी बीडवरून पुण्याला गेले होते का? असा सवाल केला जात आहे. तीन आलिशान वाहनांचे सीसीटीव्ही फुटेज समोर आल्याने याबाबतची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. ३० डिसेंबरच्या रात्री सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर तीन आलिशान गाड्यांमधून आरोपी पुण्याला गेल्याची चर्चा आहे. बीडच्या मांजरसुंबा येथील एका हॉटेलवर त्यांनी जेवण केले, तसेच एका पेट्रोल पंपावर गाडीत डिझेल भरले. याच गाड्या धाराशिव जिल्ह्यातील पारगाव टोल नाका येथे रात्री १.३६ वाजता पास झाल्या. या गाड्यांमध्ये बसून आरोपी गेले अशी चर्चा आहे. तसेच याच आलिशान वाहनांमधून त्यांना फरार होण्यास मदत केली असावी अशी शक्यता आहे. पुण्यात सीआयडीच्या कार्यालयात शरणागती पत्करताना कराड ज्या गाडीतून आला, ती गाडी याच ताफ्यातील होती, असं सांगितलं जात आहे.

## नमः शिवाय!

स्वतःच्या इंस्टाग्रामवर पोस्ट केली आहे. या ऑडिओ क्लिपमधून वाल्मिक कराड बीड जिल्हा पोलीस दलात हस्तक्षेप कशा पद्धतीने होता हे यातून दाखवण्याचा प्रयत्न केलाआहे. या ऑडिओ क्लिपची न्यूज १८ लोकमत पुष्टी करत नाही

संतोष देशमुख हत्या आणि खंडणी प्रकरणी आरोपी असलेला आरोपी वाल्मिक कराड आणि बीड पोलिसांची ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. या ऑडिओ क्लिपमध्ये कराड आणि पोलिसांमधील संवाद असल्याची चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे. हा ऑडिओ सोशल मीडियावर चांगलाचा व्हायरल झाला आहे.

कोण आहेत पोलिस अधिकारी?

वाल्मिक कराड आणि बीड शहर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांचा ऑडिओ कॉल सध्या व्हायरल होतोय. या मोबाईल कॉलमध्ये गुन्हेगार सनी आठवले याच्यावर कारवाई करू नका. त्याला कशात गुंतवू नका. तो सध्या माझ्याकडे कार्यरत नसला तरीही तो माझ्या भावासारखा आहे. सध्या स्थानिक राजकारणामुळे योगेश आणि त्याचे जमत नाही म्हणून तो सध्या तिकडे गेला आहे, असा संवाद व्हायरल झाला आहे.

पोलिस अधिकारी काय म्हणाले?

सनी हा सराईत गुन्हेगार आहे. आणि त्याच्या संबंधी वाल्मीक कराड आणि पोलीस निरीक्षक शितकुमार बल्लाळ यांच्यात थेट संवाद झाला असल्याने पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान सदर क्लिप खोटी आहे. क्लिपमधील संवाद माझा नाही. सनी आठवले हा गुन्हेगार आहे. त्याचा भाऊ देखील गुन्हेगार आहे. सनी आठवले सध्या फरार आहे. यातील आवाज माझा नाही. याप्रकरणी मी गुन्हा दाखल करणार आहे, असे पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ म्हणाले.

## भय इथलं संपत

मागत असतात. आम्हाला तू पैसे दिले नाही तर काम करू देणार नाही. तू कोण लागून गेली आहे. माझ्या मुलाला ५ जानेवारी रोजी घरी बोलावून घेतलं. तुझ्या आईला सांग, विहिरीचं काम अर्धवट झालं आहे. त्याच्या सह्या दे, नाहीतर तुझ्या आईला जेलमध्ये घालू, नाही दिले तर तुमच्या घराची इज्जत घालवू अशी धमकी दिली. माझा मुलगा कसाबसा घरी आला. त्यानं संगळं काही सांगितलं. माजी सरपंचाने १ लाख रुपये मागितले होते. मी जेव्हा शाळेचं काम करून घरी चालली होती, त्यावेळी तिघांनी मला अडवून १ लाख रुपयांची खंडणी मागितली होती, अशी माहिती मंगल राम मामडगे यांनी दिली.

माझ्या पाठीमागे कुणी नाही. त्यांच्या पाठीमागे बरीच माणसं आहे. माझ्या मागे माझं कुटुंब आहे. माझ्या मुलाने हे सगळं सहन झालं नाही म्हणून आत्महत्या केली. माझा मुलगा त्यांच्यामुळेच गेला आहे. आम्हाला ही दुश्मनी वाढवायची नव्हती त्यामुळे आम्ही गप्प होतो. पण, आम्हाला न्याय द्यावा, अशी मागणी मामडगे यांनी केली.

या प्रकरणी आता अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात न्याय नाही मिळाल्यास आत्मदहन करण्याचा इशारा देखील महिला सरपंचाने दिला आहे.

## सनी आठवलेनी,कॉल

देशद्रोहासारखा खोटा गुन्हा दाखल करून आयुष्य उध्वस्त केले जाते? देशद्रोहाचा गुन्हा डोक्यावर घेत जगण्यापेक्षा मेलेले बरे, शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ हे वाल्मीक अण्णा कराड यांचे मित्र असून मी ना.धनंजय मुंडे यांच्यासोबत दीपज्योत ग्रुपच्या माध्यमातून जोडलो गेले होतो परंतु काही कारणास्तव मी त्यांच्यापासून दूर आल्यानंतर बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्या सोबत तीन ते चार वेळेस आढळून आल्यामुळे वाल्मीक अण्णा कराड यांना माझा राग आल्याने सनी आठवलेला कोणत्याही गुन्ह्यामध्ये गुंतविण्याचे आदेश पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांना दिले होते. त्यावर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांनी लागलीच कलम १०७ मध्ये मला पोलीस स्टेशनला बोलावले होते. मी पोलीस निरीक्षक बल्लाळ यांच्या बोलविण्यावरून पोलीस स्टेशनला गेलो नाही म्हणून तो राग मनामधे धरत व अण्णाच्या सांगण्यावरून बनावट नोटा छापाईच्या प्रकरणांमध्ये माझा कसलाही संबंध नसताना संशयित आरोपी म्हणून त्यामध्ये मला जोडण्यात आले आहे.

दीपज्योत ग्रुपच्या माध्यमातून असंख्य मित्र जोडलेले आहेत बनावट नोटा छपाई प्रकरणी मनीष क्षिरसागर हा माझा मित्र आहे परंतु तो काय करतो याची पूर्वकल्पना मला नाही. वाल्मीक कराड यांच्या सांगण्यावरून पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ हे काम करत आहेत. माझ्यावर बनावट नोटा छापाई प्रकरणी खोटा गुन्हा दाखल झाल्यानंतर मी वाल्मीकांना कराड यांना फोनद्वारे संपर्क साधला व मी आमदाराचे काम करत आहे माझं चुकलं मला माफ करा असे बोलल्यानंतर लागलीच वाल्मीक कराड यांनी पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांना फोन करून त्या सनीला नका गुतवू संशयितमध्ये झाली त्याची चूक झाली ते माफी मागायला लागलंय जावुद्या द्या विषय सोडून अरे अण्णा सनी बद्दल शिफारस करू नका संदीप क्षिरसागर शिफारस करत आहे. अशा आशयाची रेकॉर्डिंग मी माझ्या फेसबुक अकाउंट वरून आपणास शेअर करत आहे.

या अगोदर पोलीस उपनिरीक्षक केजः राजेश पाटील, चंद्रभान गीते यांनी अक्षय आठवले यास मादळमोही या ठिकाणाहून अटक केले होते परंतु एफ.आय.आर मध्ये केज तालुक्यातील बरड फाटा येथे अटक केल्याचे दाखवले आहे याबाबत पुराव्यानिशी मा. विशेष पोलीस महानिरीक्षक छत्रपती संभाजी नगर यांच्याकडे तक्रार सादर केले असून त्यामध्ये पाडळशिंगी टोलनाक्यावरील सीसीटीव्ही फुटेज जोडण्यात आलेले आहेत सदर प्रकरणी वाल्मीकांना कराड यांनीच या खोट्या गुन्ह्यांमध्ये माझे नाव जाणीवपूर्वक टाकले होते. अशा पद्धतीने वाल्मीक अण्णा कराड यांनी असंख्य युवकांवर खोटे गुन्हे दाखल करून त्यांची सहानुभूती मिळविण्यासाठी संबंधित पोलीस स्टेशनला फोन करणे गुन्हा वापस घेणे बाबत सांगणे आणि मग गुन्हा दाखल झाल्यानंतर तो युवक पुन्हा त्यांचं काम करायला लागतो अशा पद्धतीने त्यांनी माझाही मिस युज करायचा प्रयत्न केला होता परंतु ते मला आवडले नसल्याने मी नामदार धनंजय मुंडे यांच्यापासून दूर आलो होतो. आमदार संदीप क्षीरसागर, आमदार सुरेश आण्णा धस, सामाजिक कार्यकर्त्या अंजलीताई दमानिया, सोशल मीडियावरील माझा मित्रपरिवार, इलेक्ट्रॉनिक मीडिया, प्रिंट मीडिया, युट्युब चॅनेल्स, या क्लिपच्या माध्यमातून मला न्याय मिळवून द्याल ही अपेक्षा बाळगतो मी गुन्हेगारी सोडून सामाजिक क्षेत्रात काम करत आहे हेच यांना खुपत आहे.

आणि आठवले गँग हा शब्द वापरू नये ही कळकळीची विनंती आम्ही गुन्हेगारी सोडून सामाजिक क्षेत्रामध्ये काम करत आहोत परंतु राजकीय आसरा घेत पोलीस प्रशासनातील काही अधिकारी-कर्मचारी जातीय द्वेष सामोरे ठेवून आम्हाला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. काही दिवसापूर्वी पोलीस निरीक्षक बल्लाळ यांनी माझ्या घरी येऊन तुमच्या आशिष अक्षय आणि सनी यांना नको का लावणार आणि देशद्रोहासारख्या गुन्ह्यामध्ये आत मध्ये टाकणार आणि त्याची शिफारस मीच करणार अशा पद्धतीची धमकी दिली होती यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याकडे रीतसर तक्रार माझ्या आईने दिलेली आहे. ती ही आपणास शेअर करतो.

सध्या पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ हे वाल्मीक अण्णा कराड यांचे काम करतात. गेल्या अनेक दिवसापासून शहर पोलीस स्टेशन येथील लॉकअप मध्ये त्यांना व्हीआयपी ट्रीटमेंट पुरवतात एस पी साहेब आपण याकडे ही लक्ष द्यावे आणि पोलीस निरीक्षक बल्लाळ यांच्या मोबाईलचा डम डाटा सीडीआर तपासावा जेणेकरून आपणास लक्षात येऊन जाईल की वाल्मीक अण्णा कराड व पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांचे मैत्रीचे संबंध आहेत म्हणून तर प्रत्येक वेळी शितल कुमार बल्लाळ हे वाल्मीकांना कराड सोबत असतात. मग ते माध्यम कोणतेही असो आणि पोलीस निरीक्षक बल्लाळ यांचेही कारनामे एस पी साहेबांनी पाहावे. गोंदी येथील झालेला प्रकार माजलगाव येथील झालेला प्रकार खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांच्यावर बडतर्फीची कारवाई होणे अपेक्षित आहे.

## पोलिस असल्याचे सांगून

येथील रामकवर उर्फ अनिता शंकर राऊत (वय ५०) ही महिला धुणीभांडी करण्याचे काम करते. तिचे पती एका हॉटेलवर काम करतात. बुधवारी सकाळी १० ते १०.३० वाजेच्या दरम्यान केज शहरातील साई नगर भागातील धुणीभांड्याचे काम उरकून विठाई पूरम भागात श्रीमती मिसाळ यांच्या घरी काम करण्यास त्या केज - कळंब रस्त्याने जात होत्या. लोहीया यांचे दुकानाचे बाजुने जात असताना समोर एक व्यक्ती उभा होता. त्याचवेळी अचानक पाठीमागुन दुचाकीवर हेल्मेट घालून आलेल्या व्यक्तीने त्यांच्याजवळ दुचाकी उभा करून त्याने शितल शिंदे यांचे घर कोठे आहे. त्यांची पेपरमध्ये बातमी आलेली आहे. त्याने पोलीस असल्याचे सांगून खाकी ड्रेस असलेले ओळखपत्र दाखवले. त्यानंतर त्याने तुमच्या गळ्यातील व कानातील सोन्याचे दागीने काढून बॅगमध्ये ठेवा. बायकांनी असे दागिने घालून फिरायचे नसते, आमचे साहेब भेट द्यायला येत आहेत असे म्हणाला. त्यांनी कानातील झुंबर काढुन पर्समध्ये ठेवले, त्याने गळ्यातील सोन्याचे मिनीगंठण काढण्यास सांगितले. त्यांना काढता येत नसल्याने त्याने गळ्यातील मिनीगंठण काढून पर्समध्ये टाकल्यासारखे केले. त्यांनी पर्स चेक केली असता त्यामध्ये बनावट गंठण दिसले. त्यामुळे त्यांनी त्यांची दुचाकी धरण्याचा प्रयत्न केला असता ते दोघे २८२९ क्रमांकाच्या दुचाकीवर बसून निघून गेले. त्यांनी १ लाख २० हजार रुपयांचे मिनीगंठण घेऊन पोबारा केला. रामकवर राऊत यांच्या तक्रारीवरून अनोळखी दोघांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. तपास जमादार श्रीकांत चौधरी हे करीत आहेत.

## तांड्यावरील घरांना

घटनास्थळाची पाहणी केली. तर बुधवारी वडवणी, बीड आणि महाराष्ट्र अंनिसच्या टीमने घटनास्थळी पोहोचून पाहणी करून शोधमोहीम सुरू केली.

कुप्पा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या ९० ते १०० लोकसंख्येच्या या तांड्यावरील पाच घरांना आतापर्यंत आग लागलेली आहे. घरातील संसारोपयोगी साहित्य, कपाटातील लॉकरमधील कागदपत्रे आणि इतरही साहित्य जळाले आहे. तसेच तांड्यावरील एका व्यक्तीचा हात भाजला आहे. जनावरांचे खाद्य, भुसकट आणि कडबाही जळाला. आठ दिवसांपासून ग्रामस्थ शेतातील कामे सोडून घरीच थांबून आहेत. तसेच ते रात्रभर जागत आहेत. दरम्यान बुधवारी दुपारीदेखील एका घराच्या मागे आग लागल्याची घटना घडली. तर सायंकाळी अंनिसच्या पदाधिकाऱ्यांनी जाळ कसा लागतो, याचे प्रात्यक्षिक दाखविले. आगीची घटना भानामतीचा प्रकार नसल्याचे पटवून देत त्यांनी प्रयोग करून दाखवले. याबाबत लवकरच स्पष्टता समोर येणार आहे.

अग्निशमन वाहनाची व्यवस्था, पोलिस बंदोबस्त

आगरतांडा येथे घराला अचानक आग लागून झालेल्या नुकसानीची पाहणी करून दोन दिवसांपूर्वीच वरिष्ठांना कळवले आहे. प्रशासन अलर्ट असून येथे एका अग्निशामक वाहनाची व्यवस्था केली आहे, तसेच पोलिसही संरक्षणाला थांबणार आहेत.